# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र



०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in

जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/५३० /पोलीस अधिक्षक कार्यालय भंडारा, दिनांकः- ३० /०९/२०१८


## "दारूबंदी जिल्हयात अवैध दारू तस्करी करणाऱ्या वाहनासह दारूसाठा पकडला"

**पोलीस अधिक्षक यांचे जिल्हा रेड पथकाची कार्यवाही**

भंडारा :- पोलीस ठाणे लाखांदुर सिमे लगत असलेले वडसा जिल्हा गडचिरोली येथे लाखांदुर मार्गे अवैध दारू वाहतुक अर्जुनी मोर. जिल्हा गोंदिया येथिल दारू तस्करी करणारे ईसम व पांढऱ्या रंगाची माल वाहु वाहन क्र. एम.एच. ३५ के ४१७८ मौजा पिंपळगाव (कोहळी) येथुन जात असल्याचे गुप्त माहिती वरून मा. पोलीस अधिक्षक श्रीमती विनीता साहू यांचे मार्गदशनात जिल्हा रेड पथक प्रमुख पोउपनि जितेंद्र आडोळे यांचे सहकारी कर्मचारी यांनी वाहन व देशी दारूनी भरलेल्या अवैध २०० पेटया एकुण किमंती १०,२०,००० रूपयाचा माल पकडुन कार्यवाही केली.

दिनांक २९ सप्टेंबर २०१८ रोजी मा. पोलीस अधिक्षक श्रीमती विनीता साहू यांचे आदेशान्वये साकोली तसेच लाखांदुर परिसरात पोउपनि जितेंद्र आडोळे हे आपले जिल्हा रेड पथकातील सहकारी कर्मचाऱ्यासह पेट्रोलींक करीत असता विश्वशनीस माहिती मिळाली की, अर्जुनी मोर. येथुन पांढऱ्या रंगाचे बोलेरो पिकअप चारचाकी वाहनाने अवैध दारू लाखांदुर मार्गे दारूबंदी असलेला जिल्हा गडचिरोली येथिल ग्राम वडसा येथे घेवुन जात आहे अशा माहिती वरून अर्जुनी मोर. ते वडसा गडचिरोली जाण्याकरता भंडारा जिल्हयातील पोलीस ठाणे लाखांदुर परिसरातील ग्राम पिंपळगाव शिवारात योग्य पंच इसमांसह सदर दारू तस्करी करणारे वाहन पकडण्याकरीता सापळा रचुन नाकाबंदी केली असता सायंकाळी ४.४५ वा. सुमारास अर्जुनी मोर. कडुन लाखांदुर कडे जाण्यारी पांढऱ्या रंगाची माल वाहु क्र. एम.एच. ३५ के ४१७८ येतांना दिसल्याने सदर वाहनाचे चालकास पोलीसांनी वाहन थांबविण्याचा इशारा केला असता चालकाचे बाजुला बसलेल्या ईसमाने पोलीस पकडु नयेत या उद्देशाने पळुन जाण्याकरीता चालते वाहनातुन रोडवर उडी मारल्याने त्यास रोडचा घसाटा मार लागला त्यामुळे तो पळुन जाण्यास असमर्थ राहील्याने पोलीसांनी त्यास ताब्यात घेतले तर वाहनाचे चालकाने ताब्यातील वाहन समोर जावुन रोडवर वाहन थांबवुन पळुन जाण्यास यशश्वी ठरला. पोलीस ताब्यात मिळुन आलेला ईसम नामे धरमु कुमार उदरूपाका, वय २१ वर्ष रा. गणेशनगर, वार्ड क्र. ३ अर्जुनी मोर. जिल्हा गोंदिया येथिल असुन याचे समक्ष वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनात कागदी खरडयाचे पेटीत ९० एम.एल. देशी दारूने भरलेले प्रत्येकी पेटीत १०० बॉटल असे अशा एकुण २०० देशी दारूच्या पेटया किंमती ५,२००,०००/ रूपयाच्या मिळुन आल्या सदर माला बाबत विचारपुस केले वरून सदर ईसम हा अर्जुनी मोर. येथिल बाजार चौाकत असलेली सरकार मान्य देशी दारू दुकाणातील नौकर असुन त्याचे कडे सदर मालाची साकोली, सानगडी मार्गे अर्जुनी मोर पर्यतचा पास परवाणा मिळुन आला परंतु अर्जुनी मोर. ते लाखांदुर कडे जाण्याचा पास परवाणा नसल्याचे सांगुन उडवा उडवीचे उत्तरे देत असल्याने त्याचे पासुन देशी दारूने भरलेल्या

२०० पेटया किंमती ५,२०,०००/ व बोलेरो पिकअप गाडी क्र. एम.एच. ३५ के ४१७८ किंमती अंदा
५,००,०००/ रूपये अवैधरित्या मिळुन आल्याने जप्त करून योग्य कार्यवाही करण्यात आली व धरमु कुमा
उदरूपाका याने पळुन जाण्याकरीता चालते गाडीमधुन उडी मारल्याने त्याचे दोन्ही पायाला व कंबरेला घसा
मार लागल्याने त्यास सर्व प्रथम लाखांदुर येथे ग्रामिण रूग्नालयात उपचार करण्यात आले. यास गुन्हयातील देश
दारू बाबत विचारपुस केली असता सदर देशी दारू अर्जुनी मोर. बाजार चौकतील सरकारी देशी दारू दुका
मालक कुमार विरय्या उदरूपाका, वय ४५ वर्ष तसेच सदर गाडीचे चालक व मालक यांनी संगणमताने क
रचुन दारूबंदी असलेला जिल्हा गडचिरोली येथिल वडसा येथे सदर माल घेवुन जात असतांना मिळुन आल्या
स.फौ. अश्विनकुमार मेहर/५३९ यांचे लेखी तक्रारी वरून पोलीस ठाणे लाखांदुर येथे नमुद आरोपीतां विरूध्द
कलम ६५(अ),७७(अ),८२(१)(२),८३(ब) महाराष्ट्र दारूबंदी कायदा १९४९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आल
गुन्हयाचा पुढील तपास पोलीस ठाणे लाखांदुर येथिल पोलीस निरीक्षक श्री. मेश्राम यांचे मार्गदर्शनात सुरू आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधिक्षक, श्रीमती विनीता साहू यांचे मार्गदर्शनात त्यांचे जिल्हा रेड पथक प्रमुख पोलीस उप निरीक्षक जितेंद्र आडोळे, सहा.फौजदार अश्विनकुमार मेहर, पोलीस हवालदार रूपचंद जांगळे, पोलीस नाईक प्रदिप डाहारे, विनोद शिवणकर, सचिन गाढवे यांनी केली आहे.

(जितेंद्र के. आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक,
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ०९४०३१०९७२०

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनीधी यांना उपरोक्त माहिती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत**, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.